महाराष्ट्र लोकसेवा आयोग
MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION
बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई 400001 (2267 0210 /148 /248,22602222 फॅक्स : 226739
Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ( 2267 0210 /148 /248, 22602
Fax : 22673915
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mahaonline.gov.in

# भाषा संचालक, सामान्य राज्य सेवा, गट-अ

**धारिका क्रमांक : २१५८ (५)/४९८/ पंधरा** **जाहिरात क्रमांक :०१/२०१४**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग यांच्या आस्थापनेवरील **भाषा संचालक, सामान्य राज्य सेवा, गट-अ** या पदाच्या एका जागेसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| एकूण पदसंख्या | अमागास |
|---|---|
| १ | १ |

२.१ सदर पद सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय क्र. अपंग-२०१३ / प्र.क्र. ३५/ अ.क.२, दिनांक ३ जुलै, २०१३ नुसार विकलांग प्रवर्गातील व्यक्तीच्या नियुक्तीसाठी अपात्र ठरविण्यात आले आहे.

**३. वेतनश्रेणी : १५,६००-३९,१०० +** (ग्रेड पे - ७,६००)/- प्रारंभिक वेतन रुपये ५०,६२०/-

**४. पात्रता -**

**४.१ वय- दिनांक १ मे, २०१४** रोजी अमागास उमेदवारांकरिता ४५ वर्षे व मागासप्रवर्गासाठी ५० वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.२** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथिलक्षम राहिल.

**४.३ शैक्षणिक अर्हता :-**

**४.३.१** 'मराठी ' विषयातील पदवी व पदव्युत्तर पदवी किमान ५५% गुणांसह धारण केलेली असावी.

**४.३.२** सांविधिक विद्यापीठाच्या ३ वर्षाच्या पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान एक वर्ष इंग्रजी किंवा व्यावहारिक इंग्रजी विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक.

**४.३.३** 'संस्कृत' विषयासह उच्च माध्यामिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. **किंवा**
सांविधिक विद्यापीठाची ' संस्कृत ' विषयातील पदवी किंवा पदव्युत्तर पदवी धारण केलेली असावी **किंवा**
मान्यताप्राप्त संस्थेची किंवा अभिमत विद्यापीठाची 'संस्कृत' विषयातील पदवी किंवा पदविका प्रमाणपत्र परीक्षा अथवा सांविधिक विद्यापीठाने मान्यता दिलेली समकक्ष परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

**४.४ अनुभव** - वरील परि.४.३ मधील शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर, जबाबदारीच्या पदावरील मराठी प्रशासनिक अनुवाद कार्य, परिभाषा कोश निर्मिती किंवा शब्दकोश व शब्दावल्या तयार करण्याच्या कामाचा ५ वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव धारण करणे आवश्यक आहे.

**टीप -जबाबदारीच्या पदावरील अनुभव म्हणजे शासनामधील किंवा सरकारी क्षेत्रातील संस्था किंवा परिसंस्था यामधील वेतनबँड. पी.बी. - २ रु. ९३००-३४८००, ग्रेड पे ४४०० किंवा त्यापेक्षा जास्त वेतनबँड ग्रेड पे मधील राजपत्रित पद असा घेण्यात येईल. तसेच यामध्ये सदर वेतनबँड व ग्रेड पे मधील पदाशी समकक्षता सुनिश्चित करता येईल अशा अन्यक्षेत्रातील पदेदेखील विचारात घेण्यात येतील.**

**४.५ प्राधान्यशिल अर्हता** - मराठी किंवा संस्कृत विषयात डॉक्टरेट (पी.एच.डी.) धारण करणा-या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

**४.६** परिविक्षाधीन कालावधी २ वर्ष राहील.

**५.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टीने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करून अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही, तसेच अपवादात्मक शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अपवादात्मक अनुभवाच्या तरतुदीच्या अनुषंगाने वयोमर्यादा शिथिल केली जाणार नाही. चाळणी परिक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**६. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना त्या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**७. कर्तव्ये व जबाबदाऱ्या** - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८. शुल्क : ८.१ अमागास - रु. ४१५/- ८.२ मागासवर्गीय - रु. २१५/-**

**९. अर्ज करण्याची पध्दत –**

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ३ जानेवारी, २०१४ ते दिनांक २३ जानेवारी, २०१४** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

९.६ www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील “ माझे खाते ” या लिंक वर क्लिक करावे.

(२) “ माझे खाते ” या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह सेल. ज्या पदासमोर ‘ **Unpaid** ’ असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ‘**Pay Now**’ अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) **“Pay Now”** या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील.

(१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३)चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१०. चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

११. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२. **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २३ जोनवारी, २०१४ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१३. **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २४ जानेवारी, २०१४ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही..**

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- ३ जानेवारी, २०१४**

**राजन बा. खोत**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**